सहकारी संस्थांची कलम ८९ अ अन्वये
निबंधक यांनी तपासणी करणेबाबत....

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे कार्यालय**
जा.क्र. सर्वसाधारण/परिपत्रक/क-८९ (अ) तपासणी/१६६०/२०१७
दिनांक - ३ /१० /२०१७

**-: परिपत्रक :-**

**वाचावे:-** १. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.प्रशासन/परिपत्रक/क-८९(अ)तपासणी/१९६/२०१५, दिनांक २५/०६/२०१५
२. या कार्यालयाचे जा.क्र. लेखापरीक्षण/परिपत्रक/क-८९(अ)/प्रपत्रे/११९५/२०१५, दिनांक ३०/१०/२०१५

उपरोक्त परिपत्रकीय दिनांक २५/०६/२०१५ मधील निर्धारित लक्षांकाप्रमाणे प्रशासन व लेखापरीक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वार्षिक तपासणी करण्याचे आदेश देण्यात आलेले होते. तथापि सदर तपासणी अहवालात गुणवत्तापूर्वक निष्कर्षाचे प्रमाण नगण्य असल्याचे निदर्शनास येते.

कलम ८९ (अ) अन्वये तपासणी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कायदयातील तरतुदीनुसार करण्यात येणारी तपासणी असल्याने तीचे कायदेशीर महत्व आहे. त्यामुळे सरसकटपणे वार्षिक तपासणी कार्यक्रम न राबविता कलम ८९ (अ) अन्वये तपासणी गुणवत्तापूर्ण व परिणामकारक होणे आवश्यक आहे. संस्थेची आर्थिक व सांपत्तीक स्थिती निदर्शनास येणेसाठी, संस्थेच्या कामकाजामधील अनियमीतता व गंभीर बाबी वेळीच निष्पन्न होणेसाठी, संस्थेस निर्धारित केलेली विवरणे नियमीतपणे सादर होणे व संस्था कायदा व पोटनियमाप्रमाणे कामकाज पार पाडत असल्याचे अधोरेखित होणेसाठी, संस्थांच्या कामकाजात गुणात्मक सुधारणा होवून प्रभावी नियंत्रण राखण्यासाठी सहकारी संस्थांची तपासणी करणे अत्यावश्यक आहे.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ नुसार संस्थांची पुढील मुद्यांवर तपासणी करण्याची कायदेशीर तरतूद आहे:-**

**अ]** अधिनियम, नियम आणि संस्थेचे उपविधी यांच्या तरतूदीचे संस्था योग्य रीतीने अनुपालन करीत आहे;

**ब]** अभिलेख आणि लेखापुस्तके योग्य नमुन्यात ठेवलेली आहेत;

**क]** संस्थेचा कारभार सुयोग्य व्यापारी तत्वानुसार आणि व्यावसायिक व कार्यक्षम व्यवस्थापनाखाली चालवला जात असल्याची निश्चिती करणे.

ड] संस्था सहकारी तत्वाचे आणि या अधिनियमांच्या तरतूदी आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम या नुसार राज्य शासनाने दिलेल्या निर्देशक तत्वांचे आणि निर्देशांचे अनुपालन करीत आहे कां याची खात्री करणे.

इ] कलम ७९ अन्वये तरतूद केलेली विवरणे निबंधकाला नियमितपणे व योग्यरितीने सादर झाली असल्याची शहानिशा: करणे;

उपरोक्त तरतुदींचा वापर करुन संबंधित निबंधकाने या परिपत्रकाव्दारे निर्धारित केलेल्या स्तरनिहाय लक्षांकानुसार सहकारी संस्थांची तपासणी करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने खालील सूचना पारित करण्यात येत आहे:-

(अ) या परिपत्रकान्वये तपासणी संबंधी उपरोक्त परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

(ब) लेखापरिक्षक नामतालिका तयार करणे, लेखापरिक्षण झालेल्या व न झालेल्या सहकारी संस्थांची सूची तयार करणे, सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण होणेचे दृष्टीने निर्देश करणे, संस्थांचे प्राप्त लेखापरीक्षण अहवालाची छाननी करणे, प्राप्त दोषदुरूस्ती अहवाल छाननी करणे, फेर लेखापरीक्षण करणे, चाचणी लेखापरीक्षण करणे (प्राप्त अहवालाच्या किमान २०% चाचणी ले.प.करणे), विनिर्दिष्ट अहवालाच्या अनुषंगाने फौजदारी स्वरूपाची कारवाई करणेबाबत नियोजन करणे, विशेष अहवालावरील कार्यवाही होते की नाही हे पाहणे, लेखापरिक्षण अहवालाची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, कर्तव्यास कसूर करणाऱ्या लेखापरिक्षकांवर कार्यवाही प्रस्तावित करणे, इ.कामे लेखापरिक्षक यांचे द्वारे होणे अनिवार्य आहे. या अनुषंगाने सद्यस्थितीत प्राप्त होणाऱ्या अहवालाची संख्या विचारात घेता व त्या अनुषंगाने उपरोक्त नमूद कामाचे स्वरूप विचारात घेता या परिपत्रकान्वये लेखापरीक्षण विभागातील अधिकारी तथा कर्मचारी यांना कलम ८९ (अ) अन्वये सहकारी संस्थांच्या तपासणीचे कामकाजातून वगळण्यात येत आहे.

(क) **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ अन्वये निबंधकांनी कारावयाची कार्यवाही:-**

**कलम ८९ अ अन्वये राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरीय निबंधकांनी करावयाच्या तपासणीचा वार्षिक तपासणी कार्यक्रम तयार करताना पुढील नमूद संस्थांचाच समावेश तपासणी कार्यक्रमात करावा.**

१) तोटयातील सहकारी संस्था

२) गतवर्षी नफ्यात व या वर्षी तोट्यात गेलेली सहकारी संस्था

३) गेल्या वर्षाचे नफ्यापेक्षा या वर्षी कमी नफा मिळविलेली सहकारी संस्था

**४) कामकाज बंद/स्थगित असलेल्या सहकारी संस्था**

**५) Negative Net worth (उणे नक्त मूल्य ) असलेल्या सहकारी संस्था**

**६) तक्रारी प्राप्त झालेल्या सहकारी संस्था**

**७) शासन अर्थसहाय्य प्राप्त सर्व सहकारी संस्था**

**८) समस्या प्रधान नागरी सहकारी पतसंस्था**

**९) लेखापरीक्षण वर्ग 'क' व 'ड'असलेल्या सहकारी संस्था.**

**१०) मोठ्या नागरी सहकारी बँका/पतसंस्था**

**७) भारतीय रिझर्व्ह बँकेने TAF CUB साठी समाविष्ट केलेल्या नागरी सहकारी बँका**

(ड) राज्य कार्यक्षेत्र असलेल्या किमान २४ सहकारी संस्थांची तपासणी सहकार आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येईल.

(इ) कलम ८९ अ अन्वये **विभाग/जिल्हा/तालुका तपासणी अधिकारी व कर्मचा-यांचा पदनिहाय वार्षिक लक्षांक संक्षिप्त स्वरुपात पुढील प्रमाणे :**

| अ. क्र. | तपासणी घेणा-या अधिका-याचे पदनाम | पदनिहाय प्रत्येकी वार्षिक तपासणी लक्षांक |
|---|---|---|
| १ | विभागीय सहनिबंधक | २४ |
| २ | जिल्हा उपनिबंधक, उपनिबंधक शहर व वॉर्ड प्रत्येकी | २४ |
| ३ | सहाय्यक निबंधक व सहाय्यक निबंधक वॉर्ड प्रत्येकी | २४ |
| ४ | सहकार अधिकारी, श्रेणी १ ,२ व सहाय्यक सहकार अधिकारी प्रत्येकी | २४ |

(उ) **राज्यातील सर्व तपासणी अधिकाऱ्यांनी कलम ८९-अ अन्वयेची तपासणी करताना** या कार्यालयाचे जा.क्र. लेखापरीक्षण/परिपत्रक/क-८९(अ)/प्रपत्रे/११९५/२०१५, दिनांक ३०/१०/२०१५ अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या प्रपत्रांप्रमाणे संस्थाप्रकार निहाय तपासणी अहवाल तयार करावा.

**वार्षीक तपासण्यांचा कृती आराखडा तयार करणेसंबंधी सूचना:-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ अन्वये सहकारी संस्थांच्या कामकाजाचे निरीक्षण तथा तपासणी करण्याचे अधिकार निबंधकास आहेत. सदर कलमानुसार अधिकारी व कर्मचारी यांनी कलम ८९ अ अन्वये करावयाच्या तपासणीबाबतचा कृती आराखडा करतांना खालील कृती निर्देश विचारात घ्यावेत.

१. राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरीय संस्थांचा कलम ८९अ अन्वये वार्षिक तपासणी कार्यक्रम संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक यांनी तयार करावा. सदरहू प्रस्तावित तपासणी कार्यक्रमातील संस्थांचे तपासणी आदेश कार्यक्षेत्रनिहाय संबंधित निबंधकाकडून पारित करावेत.

२. राज्यस्तरीय व विभागस्तरीय कार्यक्षेत्र असणाऱ्या संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्यामध्ये सदरहू संस्था वार्षिक तपासणी कार्यक्रमात तपासणीसाठी प्रस्तावित करण्यात याव्यात.

३. निश्चित केलेल्या संस्थांच्या तपासणीसाठी आदेशाने तपासणी पथक गठीत करतांना तपासणी पथक प्रमुखाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा शक्यतो समावेश करण्यात यावा.

**अ)**ज्या संस्थांची आर्थिक उलाढाल व व्यवहार मोठे आहेत (उदा.महाराष्ट्र राज्य सह.बँक, जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, नागरी सह.बँका व मोठया पतसंस्था इ.) अशा संस्थांसाठी तपासणी पथक गठीत करण्यात यावे व सर्व साधारणत: कार्यालय प्रमुख तथा गट अ स्तरातील अधिकारी हे तपासणी पथक प्रमुख म्हणून नेमण्यात यावेत.

**ब)** तपासणी पथकामध्ये संबंधित निबंधकांच्या तसेच लेखापरीक्षकांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांचा उपलब्धतेनुसार व आर्थिक व्यवहारानुरुप आवश्यक त्या प्रमाणात समावेश करावा.

**क)** ज्या संस्थांची आर्थिक उलाढाल व व्यवहार तुलनात्मकरित्या कमी आहे. अशा मध्यम व छोट्या संस्थांसाठी तपासणी अधिकाऱ्याची व्यक्तीगतरित्या नेमणूक करावयाची आहे. सदरहू तपासणीसाने संबंधित संस्थेची तपासणी स्वत: पूर्ण करावयाची आहे.

**ड)** कोणत्या संस्थांसाठी पथक गठीत करावयाचे, कोणत्या संस्थांसाठी पथक गठीत न करता तपासणीसाची नेमणूक करावयाची आहे याचे तारतम्य निबंधकाने ठेवावे.

४. संस्था तपासणी कालावधी हा संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार,उलाढाल व कार्यक्षेत्र या अनुसार कामकाजाची व्याप्ती विचारात घेऊन २ ते ५ दिवसापेक्षा अधिक राहणार नाही असा निश्चित करण्यात यावा.

५. सदरहू महत्वपूर्ण संस्थांचा तपासणी कार्यक्रम तयार करतांना संस्थास्तर, भागभांडवल व सभासद संख्या विचारात घेवून तपासणीची वारंवारीता खालील नमूद निर्देश विचारात घेवून ठरवावी.

**अ)** राज्यस्तरीय व विभागस्तरीय संस्थांची तपासणी प्रतिवर्षी पूर्ण होईल असे धोरण निश्चित करावे.

**ब)** रूपये १ लाखांचे वरील वसुल भागभांडवल असणाऱ्या सहकारी संस्थांची तपासणी दोन वर्षातून किमान एकदा पूर्ण होईल असे धोरण राबवावे.

**क)** ५० पेक्षा कमी सभासद असणाऱ्या गृहनिर्माण संस्था, रू. १ लाखाचे आतील वसुल भागभांडवल असणाऱ्या महत्वपूर्ण सहकारी संस्था, अन्य विविध प्रकारच्या सहकारी संस्थांपैकी निवडक सहकारी संस्था इ. संस्थांची तपासणी तीन वर्षातून किमान एकदा पूर्ण होईल असे पहावे.

६. राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर तपासणी कार्यक्रमामध्ये तपासणीसाठी संस्था समाविष्ट करतांना स्तरनिहाय संस्थांची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. वार्षिक तपासणी कार्यक्रमामध्ये घेण्यात आलेल्या संस्थांचे संबंधित निबंधक कार्यालयास प्राप्त असलेले तक्रार अर्ज संबंधित तपासणी अधिका-यास हस्तांतरीत करावे व तपासणी अधिका-याने तपासणी करताना सदरहू तक्रार अर्जाची चौकशी करुन निष्पन्न निरीक्षणे या तपासणी अहवालामध्ये नोंदवावीत. त्याचप्रमाणे तक्रारीच्या

मुद्यांचा स्वतंत्र अहवाल देखील निबंधकांकडे सादर करावा. तक्रार अर्ज प्राप्त असणा-या संस्थांची तपासणी प्राधान्याने करण्यात यावी.

८. वार्षिक तपासणी कार्यक्रमामध्ये राज्य व विभाग स्तरावरील संस्थांच्या समावेशाची निश्चिती दरवर्षी माहे जानेवारी मध्ये पूर्ण करण्यात यावी. त्याच प्रमाणे जिल्हा व तालुका स्तरावरील संस्थांच्या समावेशाची निश्चिती दरवर्षी माहे फेब्रुवारी मध्ये पूर्ण करण्यात यावी. अशा रितीने निबंधक निहाय राज्याचा वार्षिक तपासणी आराखडा एकत्रीतरित्या दरवर्षी १५ मार्च पर्यत तयार करून वरिष्ठांकडे सादर करावा. या वार्षिक आराखड्याप्रमाणे तपासणी कार्यक्रमाची अंमलबजावणी दरवर्षी १ एप्रील पासून करण्यात यावी.

९. एप्रीलपासूनच दर महिन्याचा लक्षांक ज्या-त्या महिन्यामध्ये पूर्ण होईल अशा रितीने संबंधित तपासणी पथक प्रमूख व तपासणी अधिकारी यांनी सहकारी संस्थांच्या तपासण्या करावयाच्या आहेत. एप्रील व मे मध्ये संस्थांचे आर्थीक लेखे व पत्रके अंतिम झाली नसतील तर मागील वर्षाच्या आर्थीक पत्रकांचा संदर्भ घेवून उपलब्ध लेख्यातील नोंदीप्रमाणे तपासणी पूर्ण करावी.

**<u>सर्वसाधारण सूचना:-</u>**

**१.** तपासणी कार्यक्रमामध्ये अधिकारी यांचेसाठी किमान प्रति माहे- २ संस्था व कर्मचारी यांचेसाठी प्रति माहे- १ संस्था इतका लक्षांक राहील. लक्षांकानुसार उपरोक्त प्रमाणे नमूद संस्थांचा तपासणी कार्यक्रमामध्ये १०० % समावेश करावा.

२. तपासणी करावयाच्या संस्थांसाठी अधिकारी, कर्मचारी यांच्या नेमणुका करताना संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार, उलाढाल व, कार्यक्षेत्र याचा विचार करुन पदानुरुप नेमणूक केली जाईल असे पहावे.

**३.** तपासणी पथक प्रमुख तथा तपासणी अधिकाऱ्याने तपासणीअंती निदर्शनास आलेल्या महत्वाच्या मुद्यांबाबत शेवटच्या दिवशी संस्थेचे संचालक मंडळ अथवा संस्थेचे अध्यक्ष किंवा कार्यकारी संचालक यांचेशी चर्चा करावी त्यानंतर तपासणी अहवाल अंतिम करावा.

**४.** वार्षिक तपासणी कार्यक्रमाप्रमाणे संस्थेची प्रत्यक्ष तपासणी पूर्ण झालेनंतर तपासणी अधिकाऱ्याने तथा तपासणी पथक प्रमूखाने ८ दिवसांचे आत तपासणी अहवाल संबंधित निबंधक व संस्थेस द्यावा. तपासणी अधिकाऱ्याने तथा तपासणी पथक प्रमूखाने तपासणी अहवालाची शकपूर्तता संस्थेकडून १५ दिवसांचे आत मागवून घेवून त्यावर दुरूस्ती शेरे, अभिप्राय नोंदवून तसा दोष निराकरण अहवाल संबंधित निबंधकाकडे सादर करावा. शकपूर्तता अहवाल मागविण्याची जबाबदारी संबंधित तपासणी अधिकाऱ्याची व तपासणी प्रमुखाची राहील.

५. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित निबंधकाने त्यातील गंभीर दोष व मुद्दे यावर संस्थेचा दोष पूर्तता अहवाल १ महिन्याचे आत संबंधित तपासणी अधिकाऱ्याचे शेरे व अभिप्रायासह मागवून कायद्यातील तरतूदीप्रमाणे आवश्यक ती पुढील कार्यवाही १ महिन्याचे आत करावी.

७. तपासणी कार्यक्रमामध्ये घेण्यात आलेल्या संस्थांची तपासणी त्या वर्षामध्ये कोणत्या क्रमाने व कधी करावयाची याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित तपासणी अधिकाऱ्यास किंवा तपासणी पथक प्रमूखास राहील.

सोबतचे **परिशिष्ट 'अ'** प्रमाणे कलम ८९ अ अंतर्गत संस्था तपासणी कामकाजाची नोंदवही संबंधित निबंधकाने आपल्या कार्यालयस्तरावर ठेवावी. सदरहू नोंदवहीमध्ये नियमीत नोंदी घेणेसाठी एका कर्मचाऱ्याची नेमणूक करावी. तसेच सोबतचे **परिशिष्ट 'ब'** प्रमाणे तपासणी केलेल्या संस्थांचा **तपासणी अंती आढळून आलेल्या गंभीर दोषांबाबत संस्थांवर केलेल्या वैधानिक कारवाई बाबतचा अहवाल** तालुका स्तरावरील सहाय्यक निबंधक यांनी एकत्रीतपणे तयार करून जिल्हा उपनिबंधक यांना **दरमहा ५ तारखेपर्यंत** सादर करावा. जिल्हा उपनिबंधक यांनी सदरहू मासीक अहवालाचे संकलन (जिल्हा पातळीवर संस्थांसह) करून त्यांचे जिल्ह्याचा एकत्रीत मासीक अहवाल संबंधित विभागीय सहनिबंधक (प्रशासन) यांना **दरमहा ७ तारखेपर्यंत** सादर करावा. विभागीय सहनिबंधक (प्रशासन) यांनी त्यांचा मासीक अहवाल एकत्रीतपणे (विभागीय पातळीवरील संस्थासह) संकलीत करून सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना **दरमहा १० तारखेपर्यंत** सादर करावा.

**(डॉ. विजय झाडे)**
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रत पुढील उचित कार्यवाहीस्तव :-**

१.विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन) सर्व
२.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीस्तव:-**

१. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे.
७. कार्यासन अधिकारी, मुख्यालय, पुणे (सर्व)

परिशिष्ट- अ

## कलम ८९ अ अंतर्गत संस्था तपासणी कामकाजाची निबंधक यांनी ठेवावयाची नोंदवही

विभाग/जिल्हा/तालुका/वॉर्ड : महिना:

| अ. क्र. | संस्थेचे नाव | कार्य क्षेत्र | संस्था मुख्यालयाचा जिल्हा | तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | तपासणी आदेश दिनांक व तपासणी कालावधी | तपासणी पुर्ण दिनांक | तपासणी अहवाल संस्था व निबंधकास सादर केल्याचा दिनांक | गंभीर दोष पूर्तता अहवाल तपासणी अधिकाऱ्यास प्राप्त दिनांक | गंभीर दोष पूर्तता अहवाल निबंधकास सादर दिनांक | पूर्तता अहवालावर निबंधकाने केलेली पुढील कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

परिशिष्ट- ब

## कलम ८९ अ अंतर्गत संस्था तपासणी कामकाजाचा अहवाल

विभाग/जिल्हा/तालुका/वॉर्ड :

| अ क्र | विभाग/ जिल्हा/ तालुका/ वॉर्ड | तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | तपासणी केलेल्या संस्थेचे नाव | **तपासणीची कारणे** (संस्था तोटयात/कामकाज बंद/तक्रार प्राप्त/ ठेवीदारांना ठेवी मिळत नाही/ ले.प. वर्ग-क ) | गंभीर दोषांबाबत संस्थांवर प्रस्तावित केलेली वैधानिक कारवाई |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |